अस्सल सोलापुरी

# सुराज्य सोलापूर

## दांडक्याने मारून खून ; आरोपीस जामीन मंजूर

**सोलापूर :** रेल्वे स्थानकाजवळ संतोष गुमटे (वय ४५ रा.दमाणीनगर) यांचा लाकडी दांडक्याने मारून खून केल्याप्रकरणी अटकेत असलेला गणपत उर्फ सुनील रामलिंग गायकवाड (रा.पटवर्धन चाळ, रामवाडी) याला ड.इस्माईल एन.शेख यांनी मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून जिल्हासत्र न्यायाधीश पी.एस.खुणे यांनी १५ हजारच्या जामीनवर मुक्त करण्याचा आदेश नुकताच दिला आहे.

२६ एप्रिल २०२४ रोजी पहाटे बाबुराव गुमटे हे हैदराबाद येथून सोलापूर रेल्वे स्थानकात उतरले होते. त्यानंतर ते स्टेशनच्या मागच्या बाजूस असलेल्या सिमेंट गोडाऊन जवळून पायी निघाले होते. त्यावेळी अनोळखी इसमाने त्यांच्या डोक्यात लाकडी दांडक्याने प्रहार केला होता. त्यात ते मयत झाले होते.

या घटनेची फिर्याद मयताचे बंधू विजयकुमार गुमटे यांनी सदर बझार पोलिसात दाखल केली होती. त्यानंतर पोलिसांनी तपास करून गणपत उर्फ सुनील गायकवाड याला अटक करून गुन्हा दाखल केला होता. त्यानंतरआरोपीने जामीन मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला होता. आरोपीच्या युक्तिवादानंतर त्याला जामिन देण्यात आला.

या प्रकरणात आरोपीतर्फे ॲड. इस्माईल शेख, ॲड. सिराज रजाक शेख,ॲड. वसीम शेख यांनी तर सरकारतर्फे ॲड. माधुरी देशपांडे यांनी काम पाहिले.





# सोलापूर जिल्ह्यावर पुन्हा अकलूजकरांची ‘कमांड’

## महायुतीचे टेन्शन वाढणार
## पवार, शिंदे अन् मोहिते-पाटील त्रिकुट आज एकत्र येणार; विधानसभेची रणनिती ठरणार

**अकलूज/प्रतिनिधी**

**आगामी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने सर्वच राजकीय पक्ष ॲक्टीव्ह मोडमध्ये आले आहेत. अशातच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार हे राज्यात दौरे करताना दिसत आहेत. ते रविवारी अकलूजमध्ये असणार आहेत. लोकसभेनंतर पुन्हा एकदा ते सुशीलकुमार शिंदे आणि विजयसिंह मोहिते पाटील यांच्यासोबत रविवारी पुन्हा एकत्र दिसणार आहेत. निमित्त आहे माजी केंद्रीय गृहमंत्री, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशीलकुमार शिंदे यांच्या ८४ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून सत्कार समारंभाचे. खा. धैर्यशिल मोहिते पाटील यांनी हा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यावर पुन्हा अकलूजकरांची कमांड आल्याचे बोलले जात आहे.**








रविवार दि. २९ सप्टेंबर रोजी अकलूज येथील विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल येथे भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजित केला असून या निमित्ताने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे प्रमुख शरद पवार व माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत, काँग्रेसचे बाळासाहेब थोरात यांच्या अध्यक्षतेखाली, सर्वपक्षीय खासदारांचा सन्मान सोहळा देखील संपन्न होत आहे. याप्रसंगी नवनिर्वाचित खासदार सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे, निलेश लंके, बजरंग सोनवणे, बाळ्यामामा म्हात्रे, भास्कर भगरे, अमर काळे व इतर नूतन खासदारदेखील कार्यक्रमाला येणार आहेत. त्यानिमित्त संपूर्ण जिल्ह्यातील राजकीय वातावरण ढवळून निघाल्याचे चित्र दिसत आहे.अकलूजकरांनी आयोजित केलेला हा भव्यदिव्य कार्यक्रम जरी सत्काराचा असला तरी विधानसभेच्या तोंडावर या कार्यक्रमाचे आयोजन केले असल्यामुळे आणि महाविकास आघाडीतील प्रमुख नेते मंडळी येणार असल्यामुळे निश्चितच सोलापूर जिल्ह्यात राजकीय चर्चांना ऊत आला आहे. या कार्यक्रमानंतर जिल्ह्याच्या राजकीय वातावरणात अनपेक्षित बदल दिसून येण्याची शक्यता असल्याने सर्वांचे डोळे या कार्यक्रमाकडे लागून राहिले आहेत. या सत्कार समारंभामुळे सोलापूर जिल्ह्यातील दहा विधानसभा मतदारसंघासह, सातारा जिल्ह्यातील फलटण आणि माण खटाव यांसह शेजारील बारामती आणि इंदापूर या मतदारसंघावर प्रभाव टाकणारा ठरणार एवढे नक्की. यंदाच्या लोकसभा निवडणुकीत ज्या पद्धतीने भाजपाने सोलापूर जिल्ह्यातील खासदारकीच्या दोन्ही जागा गमावल्या आहेत ते पाहता आजचा मेळावा सोलापूर जिल्ह्यातील विधानसभांच्या निवडणुकांवर परिणामकारक ठरणार असल्याची धाकधूक भाजप नेत्यांसह, कार्यकर्त्यांमध्ये जाणवू लागल्याचे चित्र आहे. अकलूजकरांचे शरद पवार यांच्याशी पुन्हा सुत जुळणे तसेच मोहिते पाटील यांचे भाजप पक्षातून बाहेर पडणे याचा परिणाम लोकसभा निवडणुकीत झालेला दिसून आला होता. तीच पुनरावृत्ती आता विधानसभेला होणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### रणजितसिंह मोहिते-पाटील यांच्या भूमिकेबद्दल संभ्रम

भाजपाचे विधानपरिषद सदस्य आणि शिवरत्नच्या सर्व निर्णयांमध्येमध्ये केंद्रस्थानी असलेले आमदार रणजितसिंह मोहिते पाटील यांची भूमिका अद्याप तरी गुलदस्त्यातच आहे. लोकसभेच्या निवडणुकांमध्ये काहीसे बॅकफूटवर असलेले रणजितदादा आता सर्वच आघाड्यांवर फ्रंटला खेळताना दिसत आहेत. भाजपचे आमदार असून देखील लोकसभेच्या निवडणुकीत भाजपच्या उमेदवाराला मिळालेले अपयश आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार आणि चुलत बंधू धैर्यशील मोहिते पाटील यांचा माढा मतदारसंघात झालेला विजय यामुळे आगामी काळात रणजितसिंह मोहिते पाटील काय भूमिका घेणार याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे. आगामी निवडणुकांची समीकरणे बदलण्यात रणजितदादांची सिंहाची भूमिका असू शकते... आजच्या मेळाव्यामध्ये रणजितदादांचा पक्षप्रवेश जरी नसला तरी त्यांची या कार्यक्रमाच्या नियोजनातील भूमिका व व्यासपीठावरील उपस्थिती आणि या सत्कार सोहळ्यात ते नेमकी कोणते भूमिका मांडणार याबाबत सर्वांच्या मनात सध्या तरी संभ्रमाचे वातावरण आहे.

### धैर्यशील मोहिते पाटील यांचे नेतृत्व उदयास

माढा मतदार संघाचे विद्यमान खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांनी लोकसभा निवडणुकीमध्ये घेतलेल्या भूमिकेमुळे संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शरदचंद्र पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये चैतन्याची नवीन लाट तयार झाली होती. सोलापूर जिल्ह्यातील मोहिते पाटील या मातब्बर घराण्याचा राष्ट्रवादी काँग्रेस गटामध्ये झालेल्या पक्षप्रवेश आणि धैर्यशील मोहिते पाटील यांची गाजलेली भाषणे यामुळे माढा मतदारसंघाला एक नवीन खासदार आणि नेता मिळाला. या सर्व घडामोडी बरोबर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाच्या खासदारांमध्ये नवीन व तरुण चेहरा म्हणून धैर्यशील यांची क्रेझ पाहायला मिळत आहे. त्यामुळे शरद पवार यांच्यासारखे मुरब्बी राजकारणी धैर्यशील मोहिते पाटील यांच्या खांद्यावर नवीन जबाबदारी देतील की काय? असा आशावाद कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होताना दिसत आहे.

### जिल्हा पुन्हा एकदा राष्ट्रवादीमय होणार का?

या सर्व नेत्यांच्या उपस्थितीसह अकलूजकर मोहिते पाटील हे आजच्या मेळाव्यात शक्ती प्रदर्शन करून पुन्हा एकदा संपूर्ण सोलापूर जिल्ह्याचे सत्ताकेंद्र अकलूजचे 'शिवरत्न' हेच झाल्याचे दाखवून देण्यात यशस्वी होणार का याची उत्सुकता आहे. पश्चिम महाराष्ट्रातील ज्या सोलापूर जिल्ह्याने शरद पवार यांच्यावर प्रचंड प्रेम केले तो जिल्हा पुन्हा एकदा राष्ट्रवादीमय करण्यात मोहिते पाटील गट यशस्वी होणार का? हे आगामी काळात दिसून येईल.

## पुन्हा महायुतीची सत्ता येणार : आ. पाटील

**सांगोला/प्रतिनिधी**

सध्याच्या राजकारणातील सूत्रे बदलली आहेत, गणित बदलली असून राज्यात पुन्हा महायुतीची सत्ता येणार आहे. येणाऱ्या पाच वर्षात सांगोला तालुक्यात विकासाचे पर्व आणण्यासाठी विकासाची कावड खांद्यावर घेऊन सर्वांनी हातभार लावावा. संघर्ष जर नशिबात असेल तर मला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांसाठी लढाई खेळावी लागेल असे प्रतिपादन आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले.

सांगोला शहरात यलमार समाजासाठी सामाजिक सभागृह बांधण्यासाठी आमदार शहाजीबापू पाटील यांनी एक कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याबद्दल सांगोला विधानसभा मतदारसंघातील यलमार समाजाच्या वतीने आमदार पाटील यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी पाटील बोलत होते. आमदार शहाजीबापू पाटील म्हणाले, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवारांनी सांगोल्याच्या विकासकामांची माझी



एकही फाईल अडवली नाही. १९९५ ते १९९९ या काळात शेतीला पाणी मिळाले. त्यानंतर २०१९ ते २०२४ या काळातच सिंचनासाठी पाणी मिळाले आहे. मधल्या काळात पाण्याचा एक थेंबही मिळाला नाही. विरोधी पक्षातील अनेकांनी माझा गद्दार असा उल्लेख केला आहे. मला कितीही शिव्या द्या, मला कितीही नावे ठेवा माझा विकासकामांचा धडाका सुरुवात राहणार आहे. तालुक्यात एमआयडीसी, शासकीय, मेडिकल कॉलेज, शासकीय इंजीनियरिंग कॉलेज, शासकीय फार्मसी कॉलेज आणण्याचे स्वप्न पाहिले आहे. बेरोजगार तरुणांच्या हाताला काम देण्यासाठी औद्योगिक वसाहत निर्माण करायची त्यासाठी सर्वांनी मला साथ द्या असे आवाहन आमदार शहाजीबापू पाटील यांनी केले.

यावेळी तातोबा येलपले, लक्ष्मण येलपले, प्रकाश सोळसे, बापू कोळवले, हमुनाना येलपले, विजय येलपले, अमोल पाटील, संदीप कुरे, बाळकृष्ण येलपले, सरपंच गणेश पाटील, बाळासाहेब यलमार, निवास येलपले, दत्ता यलमर, अशोक यलमर, सागर पाटील सुभाष इंगोले, शिवसेना तालुकाप्रमुख दादासाहेब लवटे, तालुका संपर्क प्रमुख अभिजीत नलवडे यलमार समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.



अक्कलकोट : सिध्दाराम म्हेत्रे यांचा सत्कार करताना खा. प्रणिती शिंदे, आ. धीरज देशमुख यांच्यासह मान्यवर.

## विकासासाठी म्हेत्रे यांच्या रूपाने काँग्रेसचा आमदार निवडून द्या

- खा. शिंदे यांचे अक्कलकोटवासियांना आवाहन
- कुरनूर धरण येथे जलपूजन
- म्हेत्रे यांचा नागरी सत्कार

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

भाजपचे नेते फक्त स्वत:साठी संघर्ष करतात. काँग्रेसचे नेते लोकांसाठी संघर्ष करतात म्हणुनच ते लोकनेते आहेत. लोकशाहीसमोर साम, दाम दंड भेद टिकत नाही हे लोकसभेने दाखवून दिले आहे. जो भीतीपोटी पळुन जातो तो नायक नसतो. सिद्धाराम म्हेत्रे यांच्यावर दबाव टाकण्यात आला. अडचणी आणल्या. पण ते लोकांसाठी संघर्ष करत राहिले. तालुक्यातील कामे करण्यासाठी, विकासासाठी सिद्धाराम म्हेत्रे यांच्या रूपाने परत एकदा काँग्रेसचा आमदार निवडून द्या. एकत्र रहा, संघटित रहा व म्हेत्रे यांना साथ द्या, ही बहिण रात्रंदिवस म्हेत्रे यांना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करेल असे ठोस आश्वासन खासदार प्रणिती शिंदे यांनी दिले.

२२ वर्षांची तपश्चर्या, अथक प्रयत्नाने उजनी धरणाचे पाणी कुरनूर धरणात आले असून, तालुक्यातील शेतकऱ्यांचे व जनतेचे स्वप्नपूर्ती झाली आहे, त्या निमित्ताने कुरनुर धरणातील पाण्याचे जलपूजन व ज्यांच्या प्रयत्नांनी पाणी आले ते माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांचे भव्य सत्कार शनिवारी शेतकऱ्यांचा वतीने ग्रामीण विद्यालय चप्पळगाव येथे करण्यात आला. त्यावेळी प्रमुख पाहुणे म्हणुन खासदार खा. प्रणिती शिंदे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सरपंच वर्षाताई भंडारकवठे होत्या. प्रारंभी कुरनूर धरण महादेव मंदिर येथे जलपूजन संपन्न झाले. यावेळी खासदार प्रणिती शिंदे, आमदार धीरज देशमुख, माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे, महिला तालुकाध्यक्षा शितल म्हेत्रे, अश्पाक बळोरगी, प्रथमेश म्हेत्रे, शिवसेना गटाचे तालुकाध्यक्ष आनंद बुक्कानुरे, राष्ट्रवादी शरद पवार गटाचे बंदेनवाज कोरबु, माजी सभापती मल्लिकार्जुन पाटील, धनेश आचलेरे, लाला राठोड, विजय राठोड, हेमंत घाटगे, अकील बागवान, सद्दाम शेरीकर, दिलीप बिराजदार, अश्पाक अगसापुरे, पांडुरंग चव्हाण, रईस टिनवाला, गणेश कोळी, सारीका चव्हाण, माजी सभापती सिद्धार्थ गायकवाड, विधानसभा युवक अध्यक्ष बाबासाहेब पाटील, शाकिर पटेल, कुरनूर सरपंच व्यंकट मोरे, विश्वनाथ भरमशेट्टी, सिध्दाराम भंडारकवठे, तालुका उपाध्यक्ष परीक्षित चौगुले, बसवराज बाणेगांव, अरुण जाधव, धनराज येळमेली, स्वामीराव सुरवसे आदींसह उपस्थित होते.

शिंदे म्हणाल्या, टीका करणे ही काँग्रेसची संस्कृती नाही. भाजपाचा प्रत्येक नेता समाजासमाजामध्ये तेढ निर्माण करायचे काम करत आहे. विकासावर बोलतच नाहीत. पण आमचे काँग्रेसचा प्रत्येक नेता हा खरा जनतेचा तळागाळातील नेता आहे. परिस्थितीवर काँग्रेसचे नेते मात करतात. निवडणुकिपुरते लाडकि बहीण योजना आणुन फसवत आहेत. बसवराज बाणेगांव यांनी स्वागत व प्रास्तविककात बीडचे पार्सल बीडला पाठवले आता बीडचे पार्सल कोणी आणले त्याला पाठविण्याची गरज आहे असे सांगितले. यावेळी शाकिर पटेल, व्यंकट मोरे, आनंद बुक्कानुरे, मल्लिकार्जुन पाटील, अश्पाक बळोरगी यांनी मनोगत व्यक्त केले. सिद्धाराम म्हेत्रे यांनी कुरनुर धरणाचा इतिहास सांगितला.सलीम पटेल यांनी सुत्रसंचालन व आभार मानले.

### संघटित होऊन हुकूमशाहीला विरोध करा : सिद्धाराम म्हेत्रे

लोकप्रतिनिधींनी असे काम केले पाहिजे जे पिढ्यानपिढ्या चालले पाहिजे. जनतेचे हीत पाहिले पाहिजे. या सरकारच्या काळात शेतकरी हा सगळ्यात जास्त भरडला गेला. उद्योग पतींना पाठींबा देत आहेत. देशातील ९० टक्के जनता गरीब राहिले पाहिजे हा छुपा अजेंडा आहे. या हुकुमशाहीला संघटित विरोध केला पाहिजे. सर्वांनी सहकार्य केलेल्यांच्या वारसांच्या उपस्थितीत आज जलपूजन झाले याचे समाधान. पाठीमागील २६ गावे व पुढील ५१ गावांना पाणी मिळेल, असे सिध्दाराम म्हेत्रे म्हणाले.

### सिद्धाराम म्हेत्रेंची तपश्चर्या पूर्ण झाली : शंकर म्हेत्रे

सिद्धाराम म्हेत्रेंनी तपश्चर्या केली.ती आज पूर्ण झाली. स्त्री व पुरुष दोनच जाती आहेत. भाजपावाले जातीपाती, पक्षपाती करतात.आगामी विधानसभा निवडणुका हा आमच्यासाठी व तुमच्यासाठी करो या मरो ची स्थिती असणार आहे, असे तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे म्हणाले.

## बारावी परीक्षेसाठी अर्ज प्रक्रिया मंगळवारपासून

**सोलापूर :** माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक मंडळातर्फे मार्च २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेचे ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू केली आहे. यासाठी विद्यार्थ्यांची अर्ज प्रक्रिया १ पासून सुरू होत आहे. नियमित शुल्कासह बारावीचे नियमित विद्यार्थी, व्यवसाय अभ्यासक्रमाचे नियमित विद्यार्थी, सर्व शाखांचे परीक्षार्थी, पुनर्परीक्षार्थी नाव नोंदणी प्रमाणपत्र मिळालेले, खासगी विद्यार्थी श्रेणी सुधार योजनेतील अंतर्गत आणि विषय घेणारे विद्यार्थी आयटीआयचे विद्यार्थ्यांनी त्यांचे परीक्षा अर्ज महाविद्यालय प्रमुख यांच्यामार्फत भरायचे आहेत.

## जिल्ह्यातील शेकडो गावांना पावसाचा फटका

**सोलापूर/प्रतिनिधी**

गेल्या दोन-तीन दिवसात जिल्ह्यात सर्वत्र मोठा पाऊस झाल्याने हजारो हेक्टर क्षेत्रातील विविध पिकांना मोठा फटका बसल्याची माहिती स्थानिक कृषी विभागाकडून मिळते आहे.

जिल्ह्यातील अनेक तालुक्यांमध्ये शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उडीद, सोयाबीन कांदा वगैरे प्रकारचे पिके घेतली असून या पिकांचे मागील दोन-चार दिवसात झालेले पावसाने मोठे नुकसान झाल्याने शेतकरी राजा हवालदिल झाला आहे. गेल्या चार दिवसांपासून तालुक्यातील अनेक गावांना पावसाच्या मोठा तडका बसला आहे. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. झालेल्या पावसामुळे गावाच्या परिसरातील ओढे, बंधारे, नाले, छोटे तळी पाण्याने ओसंडून वह लागली आहेत. या पावसामुळे खरिपातील उडीद सोयाबीन आणि कांदा या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कृषी विभागांनी ३३ टक्के पेक्षा जास्त नुकसान झालेल्या क्षेत्रात पहाणी सुरू केली आहे. उडीद व सोयाबीन ही पिके काढण्याच्या अवस्थेत होती. तर बऱ्याच ठिकाणी ही मळणीसाठी काढून ठेवलेले पिके भिजून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे.

### कांद्याचे अतोनात नुकसान

## विडी कामगारांच्या रोजगाराला नख लावू देणार नाही

**सोलापूर/प्रतिनिधी**

आज भारतात जवळपास विडी उद्योगावर १ कोटी कामगार असून महाराष्ट्रात ४ लाखाच्या घरात कामगारांचे उदरनिर्वाह अवलंबून आहे. २०१६ पासून केंद्रीय श्रम मंत्रालयाच्या वतीने विडी कामगारांना मिळणाऱ्या सवलती बंद करून ते सामान्य कोट्यातून देण्याचे प्रयोजन केले. भारत सरकार तंबाखूमुक्त भारत करण्याच्या अनुषंगाने या उद्योगावर मागील एक दशकापासून गंडांतर आलेले आहे. विडी उद्योग हे पूर्व भागातील महिलांच्या रोजगाराचे एकमेव साधन आहे. कोणत्याही परिस्थिती या उद्योगाला नख लागू देणार नाही आणि उद्योग बंद पडू देणार नाही, अशी सिंहगर्जना माजी आमदार नरसय्या आडम यांनी केली. शनिवारी दत्तनगर येथील संस्थेचे मध्यवर्ती कार्यालय येथे कॉ.मीनाक्षीताई साने महिला विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे अध्यक्ष यशोदा दंडी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी व्यासपीठावर यशोदा दंडी, यमुना सामल, नसीमा पठाण, विजयालक्ष्मी महेशन, वसीम मुल्ला, राजेंद्र गेंट्याल, वीरेंद्र पद्मा आदींची उपस्थिती होती. अनेक अडचणीमुळे बाजारात बनावट विडी उत्पादन येऊ शकेल. काळाबाजार होऊन सध्या बाजारात चालणाऱ्या विडी उत्पादकांच्या उत्पादनांवर दूरगामी परिणाम होऊन ते उद्योग बंद करू शकतील वा कामगार कायद्यानुसार संघटीत उद्योगातील मिळणारे लाभ कामगारांना देण्यापासून वंचित ठेवतील. मात्र हा डाव आपण यशस्वी होऊ देणार नाही, असे आडम म्हणाले. यावेळी ॲड. एम. एच. शेख, नसीमा शेख आदींनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक कॉ.वसीम मुल्ला यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ॲड. अनिल वासम यांनी केले.

### आडम मास्तर यांचा निर्धार



सोलापूर : विडी कामगार सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सभेत बोलताना आडम मास्तर.